# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.०

(जागतिक बँक व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त प्रकल्प)

# डीबीटी पोर्टल माहिती पुस्तिका

## (वैयक्तिक लाभार्थी)

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई

कृषि विभाग

# अनुक्रमणिका

| वर्णन | पृष्ठ |
|---|---|


१.० डीबीटी प्रणाली सारांश (DBT Portal Overview) ------------------------------ ०३

२.० प्रकल्पांतर्गत डीबीटी पोर्टलवरील प्राप्त अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी टप्पानिहाय कार्यपद्धती ------------------------------------------ ०४

३.० नोंदणी प्रक्रिया (Registration Process)

३.१ ॲग्रीस्टॅक शेतकरी (फार्मर) आय.डी. ने शेतकरी लॉगिन----------------------- ०४

३.२ भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींकरिता नोंदणी प्रक्रिया--------------------------- ०५

४.० अर्ज प्रक्रिया (Application Process)

४.१ ॲग्रीस्टॅक शेतकरी (फार्मर) आय.डी. ने शेतकरी लॉगिन----------------------- १२

४.१.१ शेतकरी प्रोफाईल ------------------------------------------------- १३

४.१.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया--------------------------------------- १५

४.१.३ माझे अर्ज-------------------------------------------------------- २२

४.१.४ अनुदान मागणी ---------------------------------------------------- २३

४.२ भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती करिता लॉगिन--------------------------------- २६

४.२.१ प्रोफाईल -------------------------------------------------------- २७

४.२.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया --------------------------------------- २९

४.२.३ माझे अर्ज -------------------------------------------------------- ३२

४.२.४ अनुदान मागणी---------------------------------------------------- ३३

## १.० डीबीटी प्रणाली सारांश (DBT Portal Overview)

महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या भागीदारीमध्ये हवामान अनुकूल शेती (Project on Climate Resilient Agriculture - PoCRA) प्रकल्प, ज्याला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (NDKSP) म्हणूनही ओळखले जाते, टप्पा -२ हा राज्यातील २१ जिल्ह्यांमधून निवडलेल्या ७२०१ गावांसाठी तयार केला आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प हा देशातील सर्वात महत्वाकांक्षी हवामान अनुकूल प्रकल्प असून प्रकल्पाची अंमलबजावणी ६ वर्ष कालावधीमध्ये करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाचा विकास उद्देश संसाधन-वापर कार्यक्षमता (Resource-use efficiency) आणि डेटा-आधारित (Data-driven) निर्णय साधनांसह उत्सर्जन-स्पर्धात्मक उत्पादन प्रणालीला प्रोत्साहन देऊन महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील अल्पभूधारक शेतकऱ्यांची लवचिकता आणि नफा सुधारणे हा आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चा मुख्य उद्देश म्हणजे "महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेतीतील नफ्यात वृद्धी करणे."

केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान वस्तूस्वरुपात न देता, सदर अनुदान लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) पध्दतीने देण्यात येणार आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांतर्गत अनुदानावर वाटप करण्यात येणाऱ्या घटकांसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण पोर्टल (DBT) राबविण्यास कृषि विभागाने मंजुरी दिलेली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातील विविध योजनांचे लाभ शेतकऱ्यांना देताना ते थेट लाभ हस्तांतरण पोर्टलद्वारे (DBT) देण्याबाबत जागतिक बँकेने मंजुरी दिलेली आहे. सदरचे लाभ थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) देण्याबाबतची कार्यपद्धती प्रकल्प व्यवस्थापन आराखडा (PIP) व वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेत देण्यात आलेली असून त्यास शासनाने मंजुरी प्रदान केलेली आहे.

प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत प्रकल्पातील विविध घटक, उपघटक व योजनांचा लाभ (योजनांची यादी सोबत जोडलेली आहे) थेट लाभ हस्तांतरण पोर्टल /प्रणाली (वेब प्लॅटफॉर्म व मोबाईल ॲप्लिकेशन ) मार्फत २१ जिल्ह्यातील निवडलेल्या लाभार्थ्यांना घ्यावयाचा आहे.

**डीबीटी यंत्रणा पारंपारिक पद्धतीच्या तुलनेत खालील फायदे प्रदान करते:**

- कागद विरहित प्रक्रिया
- अर्जदारासाठी सहजतेने वापर
- पारदर्शक आणि सुलभ शोधक यंत्रणा
- एकात्मिक पेमेंट गेटवेमुळे चुकीची अदायगी/ चुकीच्या लाभार्थ्यांना अदायगी अदा करण्यापासून रोखते
- जलद आणि सुलभ अनुदान वितरण

या पुस्तिकेमध्ये प्रकल्पासाठीच्या डीबीटी प्रणाली बाबतचे सविस्तर वर्णन देण्यात आलेले असून क्षेत्रीय स्तरावरून लाभार्थ्यांना नोंदणी, अर्ज सादर करणे व अर्थसहाय्यासाठी अनुदान मागणी करणे या बाबतच्या सर्व प्रक्रियांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

## २.० प्रकल्पांतर्गत डीबीटी पोर्टलवरील प्राप्त अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी टप्पानिहाय कार्यपद्धती:

प्रकल्पांतर्गत डीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत शेतकरी/ लाभार्थ्यांनी वैयक्तिक लाभाच्या घटकासाठी अर्ज केल्यानंतर पुढील टप्पानिहाय कार्यवाही केली जाईल;

- लाभार्थी अर्ज पडताळणी (डेस्क-१) : समूह सहाय्यक
- ग्राम कृषि विकास समिती (GKVS) मंजुरी (डेस्क-१): समूह सहाय्यक
- पूर्व स्थळ पाहणी (डेस्क-२) : सहाय्यक कृषि अधिकारी
- पूर्वसंमती प्रदान (डेस्क-३): तालुका कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी
- शेतकरी/लाभार्थी मार्फत घटकाची अंमलबजावणी व अनुदान मागणी : देयके व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता
- मोका तपासणी (डेस्क-४): सहाय्यक कृषि अधिकारी/ उप कृषि अधिकारी/ मंडळ कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी
- लेखाविषयक वित्तीय तपासणी (डेस्क-५): लेखाधिकारी (उपविभाग स्तर)
- अनुदान वितरणासाठी मान्यता (डेस्क-६) : उपविभागीय कृषि अधिकारी/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
- अनुदान अदायगी शिफारस (मेकर- प्रकल्प व्यवस्थापन कक्ष येथील लेखाधिकारी)
- अनुदान अदायगीस अंतिम मान्यता (चेकर-वित्त विशेषज्ञ, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष)


## ३.० नोंदणी प्रक्रिया (Registration Process)

### ३.१ ॲग्रीस्टॅक शेतकरी (फार्मर) आय.डी. ने शेतकरी लॉगिन


प्रकल्पांतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना नोंदणीची आवश्यकता नसल्याने सदर लाभार्थीना थेट शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक वापरून लॉगिन करावयाचे आहे. जर शेतकऱ्यांकडे शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक उपलब्ध नसल्यास सदर लाभार्थ्यांनी ॲग्रीस्टॅक या पोर्टलवर जाऊन नोंदणी करून शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक प्राप्त करणे अनिवार्य आहे.

## ३.२ भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींकरिता नोंदणी प्रक्रिया


डीबीटी प्रणालीवर नोंदणी प्रक्रिया ही फक्त प्रकल्पांतर्गत भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींना अनिवार्य असल्याने सदर लाभार्थ्यांनी नोंदणीसाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या वेबसाईटचा अथवा महाविस्तार ए. आय. ॲप्लिकेशनचा वापर करावा. प्रकल्पाच्या वेबसाईटवर गेल्यावर खालील प्रमाणे होम पेज दिसेल:




*वर्णन (Description):-* प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रवेश केल्यानंतर सुरुवातीच्या पृष्ठावर भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींना लाभार्थी नोंदणी करण्यासाठी वरीलप्रमाणे प्राथमिक स्क्रीन दिसेल. डाव्या बाजूवरील **"शेतकरी"** या ठळक शीर्षकाशेजारील हिरव्या रंगाच्या चिन्हावर क्लिक करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे पृष्ठ उघडेल.




वरील प्रमाणे उजव्या बाजूला दिलेल्या चौकटीमध्ये भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींना नोंदणी करण्यासाठी **“नोंदणी करा”** या टॅब वर क्लिक करावे. त्यानंतर प्रथम नोंदणीपूर्वी माहिती दर्शविणारी पॉपअप स्क्रीन दिसेल.




वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांची यादी व नोंदणीसाठी अनिवार्य गोष्टी तयार ठेवाव्यात. जसे कि, सक्रीय मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक (मोबाईल क्रमांक आधारशी संलग्न असावे), आवश्यक असल्यास- जात प्रमाणपत्र/ अपंगत्व प्रमाणपत्र/ महिलांकरिता घटस्फोटीत अथवा विधवा प्रमाणपत्र इत्यादींच्या स्कॅन प्रती सोबत असाव्यात. त्यांनतर **“नोंदणीसाठी पुढे जा”** या बटणावर क्लिक केल्यावर नोंदणीचे खालील प्रमाणे पहिले मुखपृष्ठ दिसेल. यामध्ये मोबाईल क्रमांक पडताळणी, आधार क्रमांक पडताळणी, इतर माहिती व स्वयंघोषणा अशा चार टप्प्यामध्ये नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.


### टप्पा-१: मोबाईल क्रमांक पडताळणी







वरीलप्रमाणे प्रथम आपला सक्रीय मोबाईल क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर खाली एक अंकगणिताचे उदाहरण दिलेले आहे त्याचे अचूक उत्तर (कॅप्चा) समोर दिलेल्या रकान्यात प्रविष्ट करा. पुढे **"ओटीपी मिळवा"** या बटणवर क्लिक करा. त्यानंतर प्रविष्ट केलेल्या मोबाईल क्रमांकावर सहा अंकी ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. पुढे प्राप्त ओटीपी दिलेल्या रकान्यात अचूक प्रविष्ट करून **"सत्यापित करा"** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर लाभार्थीचा मोबाईल क्रमांक यशस्वीरित्या सत्यापित झाल्याचा संदेश स्क्रीनवर दिसेल.

### टप्पा-२: आधार क्रमांक पडताळणी








दुसऱ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम आपला आधार क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर प्रामाणिकरणासाठी **“ओटीपी”** हा पर्याय निवडा. त्यानंतर लाभार्थीच्या आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. पुढे प्राप्त दिलेल्या रकान्यात अचूक प्रविष्ट करून **“ओटीपी पडताळा”** या बटणवर क्लिक करा. त्यांनतर लाभार्थीचा आधार क्रमांक यशस्वीरित्या पडताळला गेल्याचा संदेश स्क्रीनवर दिसेल. तसेच लाभार्थीचा आधार तपशील फोटोसह दर्शविला जाईल. त्यानंतर **“पुढे जा”** या बटणवर क्लिक करा.

### टप्पा-३: इतर माहिती





तिसऱ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम आधारनुसार पत्ता दर्शविला जाईल. यामध्ये आपला रहिवाशी पत्ता अंतर्भूत करावयाचा आहे. यामध्ये राज्य, जिल्हा, तालुका आणि गाव दिलेल्या यादीतून निवडून खाली दिलेल्या रकान्यात पिनकोड प्रविष्ट करा. पुढे जात प्रवर्ग दिलेला आहे त्यातील पर्याय निवडा, जर लाभार्थी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील असल्यास, जात प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची जात प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

महिलांकरिता विशेष संवर्ग दिलेला आहे. तो लागू असल्यास, घटस्फोटीत अथवा विधवा हा पर्याय निवडा. त्यानंतर संबधित प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

पुढे अपंगत्वाची माहिती नमूद करावयाची आहे. लाभार्थीस अपंगत्व असल्यास, अपंगत्व प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची अपंगत्व प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.


त्यानंतर भूमिहीन कुटुंबातील व्यक्तीची माहिती प्रविष्ट करावयाची आहे. त्यामध्ये सर्वप्रथम लाभार्थी ज्या प्रकल्प गावातील रहिवाशी आहे त्याचा जिल्हा, तालुका व गाव निवडावे. त्यानंतर लाभार्थी भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र अपलोड करावयाचे आहे. त्याखालील स्क्रीन मध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची भूमिहीन प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटनवर क्लिक करा. शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

**टप्पा-४: स्वयंघोषणा**




चौथ्या टप्प्यामध्ये वरीलप्रमाणे प्रथम स्वयंघोषणा पत्रातील प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मजकूर दर्शविला जाईल. त्याचे वाचन करून समजावून घेणे. प्रकल्पाच्या अटी व शर्तीशी सहमत असल्यास शेवटी

दिलेल्या रिक्त रकाणा निवडावा. त्यांनतर **“पुनरावलोकन”** या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे स्क्रीन दिसेल.




यामध्ये आपण नोंदणी करताना अंतर्भूत केलेली माहिती संक्षिप्त स्वरुपात दर्शविली जाईल. त्याची खात्री करून **“लॉगिन करा”** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर लाभार्थीचा प्रकल्पांतर्गत डॅशबोर्ड खुला होईल. तसेच लाभार्थ्यास अटी व शर्ती मान्य नसतील तर चेकबॉक्स वर क्लिक न करता **“मी सहमत नाही”** या बटणावर क्लिक करू शकतात.

## ४.० अर्ज प्रक्रिया (Application Process)


प्रकल्पांतर्गत नोंदणीकृत शेतकरी/ लाभार्थ्यांनी प्रकल्पाच्या डीबीटी प्रणालीवर वैयक्तिक लाभाच्या घटकांकरिता अर्ज प्रक्रिया करण्यासाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या वेबसाईटचा अथवा महाविस्तार ए. आय. ॲप्लिकेशनचा वापर करावा.

### ४.१ ॲग्रीस्टॅक शेतकरी (फार्मर) आय.डी. ने शेतकरी लॉगिन

प्रकल्पांतर्गत शेतकरी लाभार्थीनी थेट ॲग्रीस्टॅक शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक वापरून लॉगिन करावयाचे आहे. जर शेतकऱ्यांकडे शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक उपलब्ध नसल्यास सदर लाभार्थ्यांनी ॲग्रीस्टॅक या पोर्टलवर जाऊन नोंदणी करून शेतकरी (फार्मर) आय.डी. क्रमांक प्राप्त करणे अनिवार्य आहे. प्रकल्पाच्या वेबसाईटवर गेल्यावर होम पेज वर खालील प्रमाणे स्क्रीन दिसेल:





वरील प्रमाणे शेतकरी लाभार्थ्यांनी **"लॉगिन करा"** या पृष्ठावरील शेतकरी या टॅब अंतर्गत प्रथम प्रामाणिकृत प्रकारातून **"ॲग्रीस्टॅक शेतकरी आयडी"** हा पर्याय निवडा. त्यानंतर दिलेल्या रिक्त रकाण्यात ११ अंकी शेतकरी (फार्मर) आयडी प्रविष्ट करा. त्यानंतर खाली एक अंकगणिताचे उदाहरण दिलेले आहे त्याचे अचूक उत्तर (कॅप्चा) समोर दिलेल्या रकान्यात प्रविष्ट करून **"सत्यापित करा"** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर सहा अंकी ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. त्यापुढे प्राप्त ओटीपी दिलेल्या रकाण्यात अचूक प्रविष्ट करून **"लॉगिन करा"** या बटणावर क्लिक करा. आधारसह ओटीपी पडताळणी पूर्ण झालेनंतर खालील प्रमाणे शेतकरी डॅशबोर्ड स्क्रीन उपलब्ध होईल.




## ४.१.१ शेतकरी प्रोफाईल

वैयक्तिक लाभाच्या डीबीटी पोर्टलवर लॉगिन केल्यानंतर प्रथम शेतकरी लाभार्थीने **"प्रोफाईल"** अपडेट करणे अनिवार्य आहे. त्याकरिता डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **"प्रोफाईल"** टॅब निवडा. यामध्ये वैयक्तिक माहिती, पत्ता व शेतजमिनीची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. सदर बाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे.

### टप्पा-१: वैयक्तिक माहिती





प्रोफाईल अद्ययावत करताना प्रथम वैयक्तिक माहितीची खात्री करा. त्यानंतर नवीन मोबाईल अद्ययावत करण्याची ओटीपी आधारित कार्यप्रणाली दिलेली आहे. पुढे अपंगत्वाची माहिती नमूद करावयाची आहे. शेतकरी लाभार्थीस अपंगत्व असल्यास, अपंगत्व प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची अपंगत्व प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

पुढे जात प्रवर्ग दिलेला आहे त्यातील पर्याय निवडा, जर लाभार्थी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील असल्यास, जात प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची जात प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.


महिलांकरिता विशेष संवर्ग दिलेला आहे. तो लागू असल्यास, घटस्फोटीत अथवा विधवा हा पर्याय निवडा. त्यानंतर संबधित प्रमाणपत्र अपलोड करण्यास स्क्रीन उपलब्ध होईल. त्यामध्ये जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची प्रमाणपत्राची PDF **फाईल निवडा** व **अपलोड** या बटनवर क्लिक करा. त्यानंतर शेवटी **“पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.

**टप्पा-२: पत्ता माहिती**




वरीलप्रमाणे पुढील पृष्ठावर प्रवेश केल्यानंतर लाभार्थीने आधार क्रमांकाशी संलग्न दर्शविलेला पत्ता बरोबर असल्याची खात्री करावी.

**टप्पा-३: शेतजमिनीची माहिती**





शेत जमिनीच्या माहितीमध्ये शेतकरी लाभार्थीच्या जमिनीचे विवरण दर्शविले आहे. त्यामध्ये प्रकल्प गावातील जमिनीचा तपशील तसेच प्रकल्पाबाहेरील गावातील जमिनीचा तपशील दर्शविला आहे. सामायिक खातेदार असल्यास त्यांचा तपशील माहितीस्तव दर्शविला आहे. अर्ज करण्यापूर्वी लाभार्थी शेतकऱ्याने पाणी स्त्रोत आणि उर्जा स्त्रोत **"संपादित करा"** या लिंक वर क्लिक करून अंतर्भूत करणे आवश्यक आहे. त्यानंतर लाभार्थी शेतकरी वैयक्तिक लाभाच्या विविध घटकासाठी अर्ज करू शकतात.


## ४.१.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया


शेतकरी लाभार्थीने **"प्रोफाईल"** अपडेट केल्यानंतर डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **"नवीन बाबीसाठी अर्ज करा"** हि टॅब निवडा. यामध्ये प्रवेश केल्यानंतर खालील प्रमाणे अर्ज प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

### टप्पा-१: घटकाचे नाव निवडा










वैयक्तिक लाभाच्या घटकाची निवड करताना सर्वप्रथम दर्शविलेल्या यादी (Drop Down) मधून **“घटकाचा गट”** निवडा. त्यानंतर पुढे प्रस्तावित **“घटकाचे नाव”** निवडा. पुढे घटकाशी संबंधित **“प्रकार/पिक/हंगाम”** असल्यास दिलेल्या यादी (Drop Down) मधून आवश्यक पर्यायाची निवड करावी. तसेच संबंधित घटकास एकक लागू असल्यास **“एकक”** (उदा. अंतर, आकारमान, आकार इ.) निवडा. शेतकरी लाभार्थीने निवडलेल्या बाबींचा एकत्रित तपशील उजव्या बाजूला **“घटकाचा तपशील”** नमूद करण्यात आलेला आहे. त्याची खात्री करून उजव्या बाजूला शेवटी **“पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.


## टप्पा-२: निवडलेल्या घटकाकरिता पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे

लाभार्थी शेतकऱ्याने घटक निवड केल्यानंतर पुढील पृष्ठावर प्रकल्पांतर्गत घटकाच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी पात्रता निकष व अर्जासोबत डीबीटी पोर्टलवर अपलोड करावयाची आवश्यक कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार स्क्रीन वर उपलब्ध होईल. निवडलेल्या घटकामध्ये काही बदल


करावयाचा असल्यास **“मागे जा”** या बटणाचा वापर करावा. सदरील पृष्ठावर दिलेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर स्क्रीनच्या उजव्या बाजूला शेवटी **“पुढे जा”** या बटणावर क्लिक करावे.




## टप्पा-३: जमीन निवडा




वरील प्रमाणे दर्शविल्यानुसार, शेतकरी लाभार्थ्यास प्रकल्प गावातील जमीन व प्रकल्प बाहेरील गावातील जमीन तसेच एकूण एकंदर जमीन (हे. आर.) याचा तपशील माहितीस्तव दाखविला आहे. ज्या प्रकल्प गावामधील जमिनीवर घटकाची अंमलबजावणी करून लाभ घ्यावयाचा आहे ते **“गाव”** सर्वप्रथम निवडावे. त्यापुढे सदरील गावातील ज्या सर्वे नंबरवर लाभ घ्यायचा आहे तो **सर्वे नंबर** दिलेल्या यादी (Drop down) मधून निवडावा.




निवडलेल्या सर्वे नंबर चा तपशील स्क्रीन वर उपलब्ध होईल. यामध्ये सर्वे नंबरचा शेत क्रमांक (फार्म आय.डी.), खात्याचा प्रकार, एकूण क्षेत्र (हे. आर.) मध्ये दिसेल. तसेच शासनाच्या इतर योजनेमधून अथवा प्रस्तुत प्रकल्पातून यापूर्वी क्षेत्र आधारित इतर घटकाचे अथवा त्याच घटकासाठी लाभ घेतलेला असेल ते क्षेत्र **"लाभ घेतलेले क्षेत्र (हे. आर.)"** मध्ये दिसेल. तसेच त्याच सर्वे नंबरवर अर्ज करतेवेळी **"प्रक्रियेत असलेले क्षेत्र (हे. आर.)"** दर्शविण्यात आलेले आहे. त्यानंतर पुढे प्रस्तावित करीत असलेल्या **"घटकासाठी पात्र क्षेत्र (हे. आर.)"** प्रणालीद्वारे दर्शविलेले आहे. त्यानंतर पुढे दिलेल्या रकाण्यात **प्रस्तावित घटकासाठी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) प्रविष्ट** करा.

अर्जदार सामाईक खातेदार असल्यास, इतर खातेदारांच्या **संमतीपत्राची PDF फाईल अपलोड** करावी. त्याबाबतचा नमुना सोबत दिलेला आहे तो डाउनलोड करावा. मार्गदर्शक सूचनेतील निकषानुसार एखाद्या घटकासाठी इतर कागदपत्रे आवश्यक असल्यास, त्या कागदपत्राची PDF फाईल अपलोड करावी. त्यानंतर स्क्रीनच्या उजव्या बाजूला शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.



वरील प्रमाणे पुढे शेतकरी लाभार्थ्यास प्रविष्ट केलेल्या माहितीची पडताळणी करण्याकरिता पॉप अप स्क्रीन उपलब्ध होईल. सदर माहितीमध्ये दुरुस्ती अथवा बदल करावयाचा असल्यास **“संपादन करा”** या बटणाचा वापर करावा. माहितीची पडताळणी केल्यानंतर पॉप अप स्क्रीन च्या उजव्या बाजूला शेवटी **“अर्ज करण्यासाठी पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.


### टप्पा-४: हमीपत्र





जमिनीचा तपशील प्रविष्ट केल्यानंतर पुढील स्क्रीनवर प्रस्तावित घटकासाठीचे हमीपत्र दिसेल. त्यामधील अटी व शर्ती सहमत असल्यास स्क्रीन वर शेवटी दिलेला चेक बॉक्स निवडा व **“पुढे जा”** या बटणावर क्लिक करा.

### टप्पा-५: स्वयंघोषणा

अंतिम टप्प्यामध्ये शेवटी दिलेल्या स्क्रीन नुसार स्वयंघोषणा दिसेल. प्रकल्पाच्या नमूद केलेल्या अटी व शर्तीशी शेतकरी सहमत असल्यास, प्रत्येक अटी व शर्तीसमोरील चेक बॉक्स निवडा व **“सबमिट करा”** या बटणावर क्लिक करा.




त्यानंतर पुढील स्क्रीनवर अर्ज यशस्वीरित्या सबमिट झाल्याचा संदेश दिसेल. त्यापुढे सदर अर्ज डाऊनलोड अथवा प्रिंट करण्यासाठी बटण दिलेले आहे. त्यावर क्लिक करा व अर्ज जतन करा.



Print Download PDF

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँक यांचा संयुक्त प्रकल्प)

**दिनांक** : २७-१०-२०२५ **पावती क्र** : ३०००२११

## अर्जदाराची माहिती

**अर्जदाराचे नाव** : [redacted]

**पत्ता** : at.kukundsath post lakhamapur tha korpana

**गाव** : कुकडसाथ

**तालुका** : कोरपना **जिल्हा** : चंद्रपूर **राज्य** : महाराष्ट्र

**पिन कोड** : ४१५५२३ **दूरध्वनी क्र** : [redacted]

## घटक/बाबीचा तपशील

**घटकाचा तपशील**: ठिबक सिंचन

**घटक/ बाबीचा प्रकार** : ऑनलाईन पद्धत **अंतर (मी X मी)** १.२ X ०.६ किंवा कमी अंतर

**प्रकल्प स्थळाचे ठिकाण** : कुकडसाथ **तालुका** : कोरपना

**जिल्हा** : चंद्रपूर

**शेती क्रमांक. (फार्म आय डी क्रमांक )** : [redacted] **७/१२ गट/ सर्वे नं** : [redacted]

**एकूण क्षेत्र (हेक्टर)**: २ **मागणी केलेले क्षेत्र (हेक्टर)**: ०.२

**अंदाजित अनुदानाची रक्कम**: ₹ २३५७७ /-

## इतर माहिती

**लिंग** : पुरुष **जात प्रवर्ग** : इतर

**अपंगत्व स्थिती** : नाही

## स्वयंघोषणा

- मी, [redacted] घोषित करतो/करते की, सादर केलेली सर्व माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि अचूक आहे.
- सदर घटकासाठी मला पूर्वसंमती मिळाल्यास, मी प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचना व प्रकल्पाचे अधिकारी यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार विहित कालावधीत सदरील घटकाचे काम पूर्ण करेन / सदर घटकाची खरेदी करेन..
- सदर घटकाचे काम पूर्ण केल्यानंतरच/ खरेदी केल्यानंतरच मी प्रतिपूर्ति स्वरूपात अनुदान मिळणे करीता पात्र राहील.
- मी जर सदर घटकाचे काम पूर्ण/ खरेदी केली नाही तर मी अनुदान मिळण्यास पात्र असणार नाही
- प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.
- मी प्रकल्पाच्या प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.
- मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.
- विहित वेळेत काम न केल्यास पूर्वसंमती रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे
- मी इतर कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत सदर घटकाचा लाभ घेतलेला नाही.
- मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

**ठिकाण** : चंद्रपूर

**दिनांक** : २७-१०-२०२५

## फक्त कार्यालयीन वापराकरिता

**प्रति,**

अध्यक्ष

ग्राम कृषि विकास समिती


**गाव** : कुकडसाथ **तालुका** : कोरपना

**उपविभाग** : राजुरा **जिल्हा** : चंद्रपूर

**अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** : २७-१०-२०२५

NDKSP


### ४.१.३ माझे अर्ज





वरील प्रमाणे दर्शविल्यानुसार, शेतकरी लाभार्थ्याने सादर केलेल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी डॅशबोर्ड वरील मुख्य मेनू मध्ये **“माझे अर्ज”** या टॅब वर क्लिक करा. यामध्ये अर्जांची सध्यस्थिती व कोणत्या स्तरावर अर्ज आहे याचा तपशील दिसेल. तसेच अर्जाचा तपशील पाहण्यासाठी **“पहा”** या लिंक वर करावे. त्यानंतर खालीलप्रमाणे स्क्रीन दिसेल.




## ४.१.४ अनुदान मागणी





प्रकल्पांतर्गत घटकासाठी शेतकरी लाभार्थ्यास घटक राबविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरून पूर्वसंमती मिळेल. त्यानंतर लाभार्थी शेतकऱ्याने प्रत्यक्षात घटकाची अंमलबजावणी केल्यानंतर वरीलप्रमाणे दर्शविल्यानुसार, मुख्य मेनू मध्ये **"अनुदान मागणी"** या टॅब वर क्लिक करावे. अर्जाचा तपशील पाहण्यासाठी **"पहा"** या बटणावर क्लिक करून अर्ज पाहू शकता.




घटकाच्या अंमलबजावणी पश्चात ज्या घटकाकरिता अनुदान मागणी करावयाची आहे त्याच्या पुढील **“अनुदान मागणी”** बटणावर क्लिक करा.




वरीलप्रमाणे घटकाशी **संबंधित कागदपत्रे** (उदा. आराखडा, प्रमाणपत्रे व काम पूर्णत्वाचा दाखला इत्यादी) आवश्यक असल्यास, त्यांची PDF फाईल निवडून अपलोड करा. त्यानंतर देयके आवश्यक असल्यास, **देयकाचा तपशील** नोंद करून त्याची **PDF फाईल अपलोड** करा. यामध्ये देयकाचा क्रमांक, देयक दिनांक व रक्कम अचूकपणे प्रविष्ट करा.




एकापेक्षा अधिक देयके असल्यास वरीलप्रमाणे डाव्या बाजूला शेवटी दिलेल्या **“देयक जोडा”** या बटणावर क्लिक करून देयकांचा तपशील स्वतंत्रपणे प्रविष्ट करावा. त्यानंतर स्क्रीनच्या शेवटी उजव्या बाजुला **“अनुदान मागणी करा ”** या टॅब वर क्लिक करा.




अनुदान मागणी पश्चात वेळोवेळी आपल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी **“अनुदान मागणी”** या टॅब वर क्लिक करून प्रक्रिया स्तर पाहू शकता.




## ४.२ भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती करिता लॉगिन

प्रकल्पांतर्गत नोंदणीकृत भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींनी स्वत: चा आधार क्रमांक वापरून लॉगिन करावयाचे आहे. लॉगिन करण्यापूर्वी लाभार्थीने डीबीटी पोर्टलवर जाऊन प्रथम नोंदणी करणे अनिवार्य आहे. प्रकल्पाच्या वेबसाईटवर गेल्यावर होम पेज वर खालील प्रमाणे स्क्रीन दिसेल:





वरील प्रमाणे लाभार्थ्यांनी **"लॉगिन करा"** या पृष्ठावरील शेतकरी या टॅब अंतर्गत प्रथम प्रामाणिकृत प्रकारातून **"आधार"** हा पर्याय निवडा. त्यानंतर दिलेल्या रिक्त रकाण्यात १२ अंकी आधार क्रमांक प्रविष्ट करा. त्यानंतर खाली एक अंकगणिताचे उदाहरण दिलेले आहे त्याचे अचूक उत्तर (कॅप्चा) समोर दिलेल्या रकान्यात प्रविष्ट करून **"सत्यापित करा"** या बटणावर क्लिक करा. त्यानंतर आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर सहा अंकी ओटीपी प्राप्त होईल. जर निर्धारित वेळेत ओटीपी प्राप्त होण्यास विलंब झाल्यास पुनश्च ओटीपी मिळवण्यासाठी क्लिक करू शकता. त्यापुढे प्राप्त ओटीपी दिलेल्या रकाण्यात अचूक प्रविष्ट करून **"लॉगिन करा"** या बटणावर क्लिक करा. आधारसह ओटीपी पडताळणी पूर्ण झालेनंतर खालील प्रमाणे लाभार्थी डॅशबोर्ड स्क्रीन उपलब्ध होईल.



### ४.२.१ प्रोफाईल

वैयक्तिक लाभाच्या डीबीटी पोर्टलवर लॉगिन केल्यानंतर प्रथम लाभार्थीने आवश्यकता असल्यास **“प्रोफाईल”** अपडेट करावे. त्याकरिता डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **“प्रोफाईल”** टॅब निवडा. यामध्ये वैयक्तिक माहिती, पत्ता व प्रकल्प ठिकाणाची माहिती अद्ययावत करू शकता. सदर बाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे दिलेला आहे.

**टप्पा-१: वैयक्तिक माहिती**





प्रोफाईल अद्ययावत करताना प्रथम वैयक्तिक माहितीची खात्री करा. त्यानंतर नवीन मोबाईल अद्ययावत करण्याची ओटीपी आधारित कार्यप्रणाली दिलेली आहे. लाभार्थीस अपंगत्व असल्यास, अपंगत्व प्रमाणपत्र अपडेट करू शकता. जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची **अपंगत्व प्रमाणपत्राची PDF फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.

पुढे जात प्रवर्ग दिलेला आहे त्यामध्ये जर लाभार्थी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील असल्यास, जात प्रमाणपत्र अपडेट करू शकता. जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची **जात प्रमाणपत्राची PDF फाईल निवडा** व **अपलोड** या बटणावर क्लिक करा.


महिलांकरिता विशेष संवर्ग दिलेला आहे. तो लागू असल्यास, घटस्फोटीत अथवा विधवा हा **पर्याय अपडेट** करून संबधित **प्रमाणपत्र अपलोड** करू शकता. जास्तीत जास्त ५ एम.बी. आकाराची **प्रमाणपत्राची PDF फाईल** निवडा व **अपलोड** या बटनवर क्लिक करा. त्यानंतर शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

## टप्पा-२: पत्ता माहिती




वरीलप्रमाणे पुढील पृष्ठावर प्रवेश केल्यानंतर लाभार्थीने आधार क्रमांकाशी संलग्न दर्शविलेला पत्ता बरोबर असल्याची खात्री करावी.

## टप्पा-३: प्रकल्प ठिकाणाची माहिती






प्रकल्प ठिकाणाच्या माहितीमध्ये लाभार्थीच्या प्रकल्प क्षेत्रातील गावाचा तपशील दर्शविला आहे.

### ४.२.२ नवीन बाबीसाठी अर्ज प्रक्रिया

लाभार्थीने लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्ड स्क्रीनच्या डाव्या बाजूला मुख्य मेन्यू मध्ये **“नवीन बाबीसाठी अर्ज करा”** हि टॅब निवडा. यामध्ये प्रवेश केल्यानंतर खालील प्रमाणे अर्ज प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

**टप्पा-१: घटकाचे नाव निवडा**




वैयक्तिक लाभाच्या घटकाची निवड करताना सर्वप्रथम दर्शविलेल्या यादी (Drop Down) मधून **“घटकाचा गट”** निवडा. त्यानंतर पुढे प्रस्तावित **“घटकाचे नाव”** निवडा. पुढे घटकाशी संबंधित **“प्रकार/पिक/हंगाम”** असल्यास दिलेल्या यादी (Drop Down) मधून आवश्यक पर्यायाची निवड करावी. लाभार्थीने


निवडलेल्या बाबींचा एकत्रित तपशील उजव्या बाजूला " **घटकाचा तपशील**" नमूद करण्यात आलेला आहे. त्याची खात्री करून उजव्या बाजूला शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

### टप्पा-२: निवडलेल्या घटकाकरिता पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे


लाभार्थीने घटक निवड केल्यानंतर पुढील पृष्ठावर प्रकल्पांतर्गत घटकाच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी पात्रता निकष व अर्जासोबत डीबीटी पोर्टलवर अपलोड करावयाची आवश्यक कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार स्क्रीन वर उपलब्ध होईल. निवडलेल्या घटकामध्ये काही बदल करावयाचा असल्यास **"मागे जा"** या बटणाचा वापर करावा. सदरील पृष्ठावर दिलेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर स्क्रीनच्या उजव्या बाजूला शेवटी **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करावे.




खालील प्रमाणे लाभार्थ्यास प्रविष्ट केलेल्या माहितीची पडताळणी करण्याकरिता पॉप अप स्क्रीन उपलब्ध होईल. सदर माहितीमध्ये दुरुस्ती अथवा बदल करावयाचा असल्यास **"संपादन करा"** या बटणाचा वापर करावा. माहितीची पडताळणी केल्यानंतर पॉप अप स्क्रीन च्या उजव्या बाजूला शेवटी **"अर्ज करण्यासाठी पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.




## टप्पा-३: हमीपत्र





माहितीची पडताळणी केल्यानंतर पुढील स्क्रीनवर प्रस्तावित घटकासाठीचे हमीपत्र दिसेल. त्यामधील अटी व शर्ती सहमत असल्यास स्क्रीन वर शेवटी **दिलेला चेक बॉक्स निवडा** व **"पुढे जा"** या बटणावर क्लिक करा.

## टप्पा-५: स्वयंघोषणा


अंतिम टप्प्यामध्ये शेवटी दिलेल्या स्क्रीन नुसार स्वयंघोषणा दिसेल. प्रकल्पाच्या नमूद केलेल्या अटी व शर्तीशी शेतकरी सहमत असल्यास, प्रत्येक अटी व शर्तीसमोरील **चेक बॉक्स निवडा** व **"सबमिट करा"** या बटणावर क्लिक करा.



त्यानंतर पुढील स्क्रीनवर अर्ज यशस्वीरित्या सबमिट झाल्याचा संदेश दिसेल. त्यापुढे सदर अर्ज डाऊनलोड अथवा प्रिंट करण्यासाठी बटण दिलेले आहे. त्यावर क्लिक करा व अर्ज जतन करा.





## ४.२.३ माझे अर्ज





वरील प्रमाणे दर्शविल्यानुसार, शेतकरी लाभार्थ्याने सादर केलेल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी डॅशबोर्ड वरील मुख्य मेनू मध्ये **“माझे अर्ज”** या टॅब वर क्लिक करा. यामध्ये अर्जांची सध्यस्थिती व कोणत्या स्तरावर अर्ज आहे याचा तपशील दिसेल.

## ४.२.४ अनुदान मागणी




प्रकल्पांतर्गत घटकासाठी लाभार्थ्यास घटक राबविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरून पूर्वसंमती मिळेल. त्यानंतर लाभार्थीने प्रत्यक्षात घटकाची अंमलबजावणी केल्यानंतर वरीलप्रमाणे दर्शविल्यानुसार, मुख्य मेनू मध्ये **“अनुदान मागणी”** या टॅब वर क्लिक करावे. अर्जाचा तपशील पाहण्यासाठी **“पहा”** या बटणावर क्लिक करून अर्ज पाहू शकता.

घटकाच्या अंमलबजावणी पश्चात ज्या घटकाकरिता अनुदान मागणी करावयाची आहे त्याच्या पुढील **“अनुदान मागणी”** बटणावर क्लिक करा.




वरीलप्रमाणे घटकाशी संबंधित **देयकाचा तपशील** नोंद करून त्याची PDF **फाईल अपलोड** करा. यामध्ये देयकाचा क्रमांक, देयक दिनांक व रक्कम अचूकपणे प्रविष्ट करा. एकापेक्षा अधिक देयके असल्यास वरीलप्रमाणे

डाव्या बाजूला शेवटी दिलेल्या **“देयक जोडा”** या बटणावर क्लिक करून देयकांचा तपशील स्वतंत्रपणे प्रविष्ट करावा. त्यानंतर स्क्रीनच्या शेवटी उजव्या बाजुला **“अनुदान मागणी करा ”** या टॅब वर क्लिक करा.

अनुदान मागणी पश्चात वेळोवेळी आपल्या अर्जाची स्थिती पाहण्यासाठी **“अनुदान मागणी”** या टॅब वर क्लिक करून प्रक्रिया स्तर पाहू शकता.

